नियमित फौजदारी खटला **नं.** २७५/**२०**१४

निशाणी क्र**.**४८

**(**साक्षीदारास व्ही.सी**.** द्वारे हजर केले**)**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.**२ **यांचा जबाब**

मी, शपथेवर निवेदन करतो की,

माझे नाव - मिर्झा वहाब मन्सब बेग

माझे वय- ६५ वर्षे व्यवसाय – सेवानिवृत्त

राहणार - नांदेड, ता., जि. नांदेड

सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा**.** सरकारी अभियोक्ता श्री**.** बी.पी**.** शिवलकर यांचेकडुन

दिनांक १५/०९/२०१४ रोजी मी पोलीस स्टेशन, कळंब येथे सहा. पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. पेट्रोलिंग करत असताना, आठवडी बाजारात आरोपी हा ताहेर मोमीन यांना खतम करतो म्हणुन आरडाओरडाव शिवीगाळ करत आहे अशी माहीती मिळाली. त्यानंतर आम्ही तेथे गेलो. तो आम्हाला पाहुन पळुन जात होता. माझ्या सोबतच्या कर्मचा-यांनी त्यांना पकडले. आम्ही त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या शर्टच्या पाठीमागे एक तलवार मिळुन आली. सदरची तलवार आम्ही दोन पंचांसमक्ष पंचनामा करुन जप्त केली. आता मला अभिलेखावरील निशाणी ४५ वरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचांची आणि आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर आरोपीविरुध्द मी फिर्याद दिली. आता मला अभिलेखावरील फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ४९ देण्यात आले. आता मला अभिलेखावरील प्रथम छापील खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. प्रथम छापील खबर

अहवालास निशाणी ५० देण्यात आले.

२. आरोपीस पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही. आरोपीकडुन जप्त केलेली तलवार दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला जी.एम.आर.क्र.५७/२०२२ वरील तलवार दाखविण्यात आली. ती तीच आहे. तीस वस्तु अ देण्यात आले.

उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री**.** बी**.**बी**.** कोळपे यांचेकडुन

३. आम्ही पेट्रोलिंग करण्याकरीता गेलेल्या गाडीचा क्रमांक आठवत नाही. पेट्रोलिंग करण्याकरीता जाण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद केल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आठवडी बाजारात खुप गर्दी असते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे तलवार कोणापासुन जप्त केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपी तलवारीसह दिसला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तलवार जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्त केलेली तलवार वस्तु अ प्रमाणे नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

NITIN
MAHADEO
REDDY

Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.05.29
16:32:18 +0530

दिनांक- २९/०५/२०२६

( एन**.** एम**.** रेड्डी)

न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,

कळंब (कोर्ट क्र. २)